## अनाथ/ निराश्रीत मुलांकरीता वार्षिक शैक्षणिक शुल्कासाठी (फी) अर्थसहाय्य करणे.

**योजना उद्देश** :- नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील अनाथ मुलांना आश्रय देणा-या सेवा भावी संस्था आर्थिक अडचणीमुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास असमर्थ ठरतात व अनाथ विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात ते शिक्षण घेवू शकत नाहीत, शिवाय ज्यांचे आई-वडील हयात नाहीत परंतू इतर नातेवाईक त्यांचे पालन पोषण करतात किंवा शिक्षणापासून वंचित राहीलेल्या मुलांच्या शैक्षणिक अशा निराधार मुला/मुलींचे शैक्षणिक शुल्क(फी) दिल्यास त्यांची शैक्षणिक प्रगती व गुणवत्ता वाढीस मदत होईल.

**कार्यक्षेत्र** :- नवी मंबई महानगरपालिका.

**भौतिक उद्दीष्ट** :- इयत्तानिहाय प्राप्त लाभार्थी संख्येनुसार

**अनूदानाची रक्कम** (प्रति लाभार्थी) **:-**

| अ.क्र. | इयत्ता | मासिक फी | अर्थसहाय्य (वार्षिक) |
|---|---|---|---|
| १. | १ ली ते ४ थी पर्यंत (प्राथमिक) | ५००/- | ६,०००/- |
| २. | ५ वी ते ७ वी पर्यंत (माध्यमिक) | ७००/- | ८,४००/- |
| ३. | ८ वी ते १० वी पर्यंत (उच्च माध्यमिक)` | १०००/- | १२,०००/- |
| ४. | ११ वी ते १२ वी (विद्यालयीन) | १२००/- | १४,४००/- |
| ५. | महाविद्यालयीन ते पदवी | १५००/- | १८,०००/- |
| ६. | पदवीनंतरचे शिक्षण | १७००/- | २०,४००/- |

**योजनेच्या अटी व शर्ती**

१. अर्जदाराचे वास्तव्य क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ वीज बिल/ आधार कार्ड/ ३ वर्षाचा भाडे करारनामा/ पारपत्र (Pass Port)/ रेशनकार्ड / विवाह नोंदणी दाखला / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल. स्वयंसेवी संस्थेमध्ये असल्यास संस्थेचे Affidavit.
२. अनाथ/निराश्रीत असलेबाबतचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
३. विद्यार्थ्यांने मागील शैक्षणिक वर्षातील शिक्षण पूर्ण केलेले असावे. सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक राहील. शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र.
४. निराधार मुलांच्या संदर्भात आई-वडिल मयत असलेबाबत दोघांच्याही मृत्यूचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
५. अर्जासोबत अनाथ/निराश्रीत विद्यार्थ्याचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
६. जे सामाजिक संस्था/मंडळे अनाथ/निराश्रीत मुलांचे संगोपन करत आहेत व ज्या सामाजिक संस्था/मंडळांना शासनाचे अनुदान मिळत नाही अशा सामाजिक संस्था/मंडळे अनाथ/निराश्रीत मुलांचे या योजनेकरीता अर्ज करु शकतात. अनुदान घेत नसल्याबाबतचा पुरावा सादर करणे.
७. लाभार्थ्यांस महानगरपालिकेकडील विहीत नमुन्यात व मुदतीत अर्ज करावा लागेल.
८. शाळेत प्रवेश घेतलेबाबतचा पुरावा म्हणून बोनाफाईड सर्टिफीकेट व फी (शुल्क) भरणा केलेबाबतची पावती सादर करणे बंधनकारक राहील.
९. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
१०. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

**महिला व बालकल्याण समिती अंतर्गत तरतुदीमधून :- अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून**

अर्ज विनामुल्य

# नवी मुंबई महानगरपालिका
## अनाथ निराश्रीत मुलांकरीता वार्षिक शैक्षणिक शुल्कासाठी (फी) अर्थसहाय्य मिळणेबाबत.

अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा छायांकित फोटो

१. अर्जदाराचे/संस्थेचे नाव :- ------------------------------------------------------------

२. मुलाचे नांव :- ------------------------------------------------------------

३. संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

प्रभाग क्र. _______, ------------------------- विभाग, नवी मुंबई.

किती वर्षापासून वास्तव्य _______. संपर्क क्र. ________________________

४. जन्मतारीख :- ______/______/________ वय :- ________

५. शैक्षणिक पात्रता :- -----------------------------

६. धर्म :- ----------------------------- जात :- --------------------------------

७. मुलगा/मुलगी शिक्षण घेत असलेला वर्ग :- _________

८. शाळेचे नांव व पत्ता :- ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

९. आधार कार्ड क्र. :- ____________________________________

१०. ज्या बँकेत बचत खाते आहे त्या बँकेचे नांव :- ---------------------------------------------- शाखा ---------------------

खातेदाराचे नांव :- ---------------------------------------------------

खाते क्र. :- | | | | | | | | | | | | | | |

IFSC Code :- ___________________________

## हमीपत्र

मी/आम्ही -------------------------------------------- हमी देते/देतो की, वरील विषयात नमुद केलेल्या कारणासाठी मला यापुर्वी महानगरपालिका / शासन वा अन्य संस्थेकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळालेली नाही. सदरील अर्थसहाय्याचा उपयोग मी/आम्ही पाल्याच्या शैक्षणिक उन्नतीसाठीच करु, गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास होणाऱ्या संभाव्य कायदेशीर कारवाईस माझी/आमची हरकत असणार नाही. तरी मला/ माझ्या पाल्याला/अनाथ विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणेस विनंती आहे.

दिनांक :- _____/_____/_______ **अर्जदाराची स्वाक्षरी/-**

---

## कार्यालयीन कामाकरीता

१ अर्ज क्रमांक. ------------

२ अर्जदार यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे/नाही. ---------------

३ लाभार्थी पात्र /अपात्र. ------------------

४ सदर लाभार्थ्यानी यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नाही. त्यांनी मागणी केलेल्या योजनेचा लाभ देण्यास मंजूरीस्तव सादर.

५ मागील वर्षी लाभ घेतलेल्या योजनेचे नांव -------------------------------------------

**समुहसंघटक (स.वि.वि.)**

# छाननी समिती

**छाननी समितीचा अभिप्राय -** उपरोक्त अर्जातील सादर केलेली माहिती तपासली असून ती बरोबर आहे.
**सदर अर्ज पात्र / अपात्र आहे.** अपात्र असल्यास अपात्रतेचे कारण - ____________________________

**समाजसेवक (स.वि.वि.)** **समाज विकास अधिकारी (स.वि.वि.)**

**आवश्यक कागदपत्रे. (कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे)**

१. वास्तव्य पुरावा - मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ वीज बिल/ आधार कार्ड/ ३ वर्षाचा भाडे करारनामा/ पारपत्र (Pass Port)/ रेशनकार्ड / विवाह नोंदणी दाखला / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा/ सलग ३ वर्षाचा नमुंमपाच्या हद्दीतील शाळेत शिकत असल्याचा पुरावा/ स्वयंसेवी संस्थेमध्ये असल्यास संस्थेचे Affidavit म्हणून सादर करावा लागेल.
२. अनाथ/निराश्रीत असलेबाबतचा संस्था /पालकांचा मा. न्यायालयाकडील/ पोलीस स्टेशन कडील दाखला
३. निराधार मुलांच्या संदर्भात आई-वडील यांचा मृत्यू दाखला जोडणे आवश्यक.
४. मुलगा / मुलीच्या शिक्षणाबाबतचा दाखला गुणपत्रिका व बोनाफाईड प्रमाणपत्र.
५. अनाथ मुले संस्थेत राहत असल्यास संस्थेने शासनाकडून कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती घेत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र स्टॅम्प पेपरवर (नोटरी करुन) सादर करणे आवश्यक.

---

**अटी व शर्ती -**

१. अर्जासोबत अनाथ/निराश्रीत विद्यार्थ्याचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
२. जे सामाजिक संस्था/मंडळे अनाथ/निराश्रीत मुलांचे संगोपन करत आहेत व ज्या सामाजिक संस्था/मंडळांना शासनाचे अनुदान मिळत नाही अशा सामाजिक संस्था/मंडळे अनाथ/निराश्रीत मुलांचे या योजनेकरीता अर्ज करु शकतात. अनुदान घेत नसल्याबाबतचा पुरावा सादर करणे.
३. लाभार्थ्यांस महानगरपालिकेकडील विहीत नमुन्यात व मुदतीत अर्ज करावा लागेल.
४. मुळ शिधापत्रिका दाखविल्यानंतर योजनेचा लाभ मिळणार आहे.
५. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.
६. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील.